**<u>ठळक बातम्या</u>**

- विधानसभा निवडणुकीसाठी देवेंद्र फडणवीस, उदय सामंत, राहुल नार्वेकर यांच्यासह विविध उमेदवारांकडून अर्ज दाखल

- विधानसभा निवडणुकीसाठी काँग्रेसची पहिली तर राष्ट्रवादी काँग्रेसकडून उमेदवारांची दुसरी यादी जाहीर

- नवे सरन्यायाधीश म्हणून न्यायमूर्ती संजीव खन्ना यांची नियुक्ती, मुंबई उच्च न्यायालयातही पाच नवीन न्यायमूर्तींनी घेतली शपथ

**आणि**

- परदेशी गुंतवणुकदारांनी केलेल्या विक्रीमुळं देशाच्या शेअर बाजारात आजही मोठी घसरण

**<><><><><>**

महाराष्ट्रात विधानसभा निवडणुकीची लगबग सुरू झाली आहे. विविध पक्षांनी उमेदवार याद्या जाहीर केल्या असून, उमेदवारांनी अर्ज भरायला सुरुवात केली आहे.

भाजपाचे वरिष्ठ नेते आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दक्षिण पश्चिम नागपूर विधानसभा मतदारसंघासाठी आज उमेदवारी अर्ज दाखल केला. यावेळी केंद्रीय मंत्री नितीन गडकरी, भाजपचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे उपस्थित

होते. त्याआधी त्यांनी संविधान चौक ते आकाशवणी चौक रॅली काढली, तसंच त्यानंतर झालेल्या सभेला संबोधित केलं.

शिवसेना नेते आणि मंत्री उदय सामंत यांनी रत्नागिरी विधानसभा मतदारसंघातून अर्ज दाखल केला. अर्ज सादर करण्याआधी त्यांनी रॅली काढून शक्तीप्रदर्शन केलं. आशिष शेलार यांनी वांद्रे पश्चिम मतदारसंघातून तर शिवसेनेचे नेते प्रताप सरनाईक यांनी ओवळा माजीवडा मतदारसंघातून अर्ज दाखल केला. विधानसभा अध्यक्ष आणि भाजपा नेते राहुल नार्वेकर यांनी कुलाबा मतदारसंघातून अर्ज दाखल केला.

**<><><><><>**

महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीसाठी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षानं आज दुसरी यादी जाहीर केली. पक्षाचे अध्यक्ष अजित पवार आणि प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे यांनी याची घोषणा केली. यात अणुशक्तीनगर इथून नवाब मलिक यांची मुलगी सना मलिक, इस्लामपूरमधून निशिकांत पाटील, तासगाव - कवठे महांकाळ मधून संजय पाटील, वडगाव शेरी इथून सुनील टिंगरे, शिरूर इथून ज्ञानेश्वर कटके यांना उमेदवारी देण्यात आली आहे. दरम्यान, काँग्रेसचे आमदार झिशान सिद्दीकी आणि भाजपाचे प्रताप पाटील चिखलीकर यांनी आज राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये प्रवेश केला. त्यानंतर पक्षानं चिखलीकर यांना लोहा मतदारसंघातून तर सिद्दिकी यांना वांद्रे पूर्व इथून उमेदवारी जाहीर केली.

**<><><><><>**

काँग्रेस पक्षानं ४८ उमेदवारांची पहिली यादी काल जाहीर केली. यामध्ये कराड पश्चिम मतदार संघातून माजी मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण, साकोली इथून

नाना पटोले, ब्रह्मपुरी - विजय वडेट्टीवार, तिवसा - यशोमती ठाकूर, संगमनेर - बाळासाहेब थोरात तर पलूस इथून विश्वजीत कदम यांना

उमेदवारी देण्यात आली आहे. लातूर शहर मतदारसंघातून अमित देशमुख यांना, लातूर ग्रामीण मधून धीरज देशमुख, हदगाव - माधवराव पाटील, भोकर - तिरुपती कोंडेकर, नायगाव - मिनल पाटील खतगावकर, पाथ्री - सुरेश वरपुडकर, तर फुलंब्री मतदारसंघातून विलास औताडे यांना उमेदवारी जाहीर करण्यात आली आहे.

**<><><><><>**

झारखंडमध्ये विधानसभा निवडणुकीच्या पहिल्या टप्प्यासाठी उमेदवारी अर्ज भरण्याची आज शेवटची तारीख आहे. या टप्प्यात १३ नोव्हेंबरला, ४३ मतदारसंघांत मतदान होणार असून, आतापर्यंत ७४८ उमेदवारांनी अर्ज दाखल केले आहेत. दरम्यान, झारखंडच्या आगामी विधानसभा निवडणुकीसाठी काँग्रेसने आणखी सात नावांची घोषणा केली आहे. के. एन. त्रिपाठी डाल्टनगंजमधून तर निशात आलम पाकौरमधून लढणार आहेत.

**<><><><><>**

राज्यात आचारसंहितेच्या काळात विविध अंमलबजावणी यंत्रणांद्वारे करण्यात आलेल्या कारवाईत कालपर्यंत एकूण ९० कोटी ७४ लाख रुपयांची मालमत्ता जप्त करण्यात आली आहे.  आज पुण्यातून १३८ कोटी रुपयांचं सोनं जप्त केल्याचं वृत्त आहे.

कालच्या एका दिवसात ५२ कोटी रुपयांची मालमत्ता जप्त करण्यात आली असल्याची माहिती मुख्य निवडणूक अधिकारी कार्यालयानं दिली आहे. धनशक्तीचा

वापर करुन मतदारांना प्रलोभन दाखवणाऱ्यांना लगाम घालण्यासाठी आयकर विभाग देखील पुढे सरसावला आहे. विधानसभा निवडणुकांच्या काळात पैशांचा गैरवापर रोखण्याच्या उद्देशानं प्राप्तीकर विभागानं मुंबई इथं नियंत्रण कक्षाची स्थापना केली आहे. हा नियंत्रण कक्ष आठवड्याचे सातही दिवस चोवीस तास सुरु असेल. राज्यभरात सी-व्हिजिल ॲपवर आचारसंहिता भंगाच्या एकूण १ हजार १४४ तक्रारी प्राप्त झाल्या असून, त्यापैकी ९९ टक्के म्हणजेच १ हजार १४२ तक्रारी निवडणूक आयोगाकडून निकाली काढण्यात आल्या आहेत.

**<><><><><>**

श्रोते हो, विधानसभा निवडणुकीच्या निमित्तानं ‘आढावा विधानसभा मतदारसंघांचा’ हा कार्यक्रम दररोज संध्याकाळी ७ वाजून १० मिनिटांनी अस्मिता वाहिनीसह प्रादेशिक वृत्त विभागाच्या Youtube वरुन प्रसारित केला जात आहे. या कार्यक्रमात आज **मुंबई पूर्व उपनगरातल्या** मतदारसंघांचा आढावा आपल्याला ऐकता येईल.

**<><><><><>**

भारत आणि जर्मनीचे संबंध प्रत्येक पातळीवर दृढ होत असून पुढच्या २५ वर्षात हे संबंध नवी उंची गाठतील, असं प्रतिपादन प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी केलं. १८ व्या आशियाई पॅसिफिक परिषदेलाही ते संबोधित करत होते. भारत हे वैविध्य आणि सुरक्षिततेचं केंद्र बनत असून भारत आणि जर्मनी यांच्यातले संबंध जगाच्या भविष्यासाठी अत्यावश्यक असल्याचे प्रधानमंत्री म्हणाले. जगाला स्थिरता, विश्वास आणि पारदर्शकतेची गरज आहे, समाज आणि पुरवठा साखळीमध्येही या मूल्यांची अत्यंत आवश्यकता आहे, असं प्रधानमंत्र्यांनी सांगितलं.

जर्मनीचे चॅन्सलर ओलाफ शोल्झ यांनी प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांची आज नवी दिल्लीत भेट घेतली. अर्थव्यवस्था, गुंतवणूक आणि उत्पादन, तंत्रज्ञान आणि नवोन्मेष या क्षेत्रातल्या सहकार्याविषयी दोन्ही नेत्यांमध्ये द्विपक्षीय चर्चा झाली. अनेक जागतिक विषयांवर चर्चा झाली तसंच भारत आणि जर्मनीचे संबंध अबाधित ठेवण्याविषयी दोन्ही देशांनी सहमती दर्शवली.

त्यानंतर प्रधानमंत्री नरेंद्र मोदी आणि चॅन्सलर ओलाफ शोल्झ यांच्या अध्यक्षतेखाली आंतर सरकारी बैठक झाली. दोन्ही देशांच्या धोरणात्मक भागीदारीत चांगली प्रगती झाली आहे, असं प्रधानमंत्र्यांनी या बैठकीवेळी सांगितलं. संरक्षण, तंत्रज्ञान, ऊर्जा, शाश्वत विकास या क्षेत्रांमध्ये दोन्ही देशांच्या वाढत्या सहकार्याविषयी त्यांनी गौरवोद्गार काढले.

**<><><><><>**

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी येत्या २७ तारखेला मन की बात या आकाशवाणीवरच्या कार्यक्रमातून नागरिकांशी संवाद साधणार आहेत. कार्यक्रमाचा हा ११५ वा भाग आहे. श्रोते आजपर्यंत टोल फ्री क्रमांक, नमो ॲप किंवा मायजीओव्ही ओपन फोरम वरून आपली मतं, सूचना पाठवू शकतात.

**<><><><><>**

देशाचे नवे सरन्यायाधीश म्हणून न्यायमूर्ती संजीव खन्ना यांची नियुक्ती करण्यात आली आहे. विद्यमान सरन्यायाधीश न्यायमूर्ती धनंजय चंद्रचूड यांचा कार्यकाळ येत्या १० नोव्हेंबरला पूर्ण होत असून, न्यायमूर्ती खन्ना येत्या ११ नोव्हेंबरपासून  सरन्यायाधीश पदाची सूत्रं स्वीकारतील. विद्यमान सरन्यायाधीश

चंद्रचूड यांच्याशी चर्चा करून राष्ट्रपती द्रौपदी मूर्मू यांनी हा निर्णय घेतल्याचं केंद्रीय कायदे मंत्री अर्जुनराम मेघवाल यांनी समाज माध्यमावरच्या संदेशात म्हटलं आहे.

मुंबई उच्च न्यायालयातही अतिरिक्त न्यायमूर्ती म्हणून पाच नवीन न्यायाधीशांनी शपथ घेतली आहे. मुंबई उच्च न्यायालयाचे मुख्य न्यायमूर्ती देवेंद्र कुमार उपाध्याय यांनी त्यांना पदाची शपथ दिली. यात निवेदिता प्रकाश मेहता, प्रफुल्ल सुरेंद्रकुमार खुबलकर, अश्विन दामोदर भोबे, रोहित वासुदेव जोशी आणि अद्वैत महेंद्र सेठना यांचा समावेश आहे. हे न्यायमूर्ती आजपासून पुढच्या दोन वर्षांच्या कालावधीसाठी काम करणार आहेत. या नवीन नियुक्त्यांमुळे आता मुंबई उच्च न्यायालयात न्यायमूर्तींची संख्या ६९ झाली आहे.

<><><><><>

गेल्या ७५ वर्षांत सर्वोच्च न्यायालयाचं रूप बदलून ते जनतेचं न्यायालय झालं आहे, असं प्रतिपादन विद्यमान सरन्यायाधीश न्यायमूर्ती डी.वाय. चंद्रचूड यांनी सर्वोच्च न्यायालयाच्या ७५ व्या वर्धापन दिनानिमित्त आकाशवाणीला दिलेल्या विशेष मुलाखतीत केलं आहे. देशाचं सर्वोच्च न्यायालय लोकन्यायालय म्हणून काम करतं असं उदाहरण जगात विरळच आहे असं ते म्हणाले. ही विशेष मुलाखत आज रात्री साडे नऊ वाजता प्रसारित करण्यात येणार आहे.

<><><><><>

देशातले शेअर बाजारात आजही मोठ्या प्रमाणात घसरले आहेत. अनेक कंपन्यांचे दुसऱ्या तिमाहीचे निकाल खराब आल्यानं तसंच विदेशी गुंतवणूकदारांनी विक्री कायम ठेवल्यानं ही घसरण झाल्याचं तज्ज्ञांनी सांगितलं. व्यवहारांची सुरुवात आज झाली तेव्हा बाजारात तेजी होती पण नंतर थोड्याच वेळात घसरण झाली. सध्या सेन्सेक्स सुमारे ८०० अंकांनी घसरुन ७९ हजार ३०० अंकांच्या

जवळपास व्यवहार करतो आहे. निफ्टी सुमारे ३०० अंकांनी घसरुन २४ हजार १०० च्या आसपास आहे.

**<><><><><>**

न्यूझीलंडविरुद्धच्या कसोटी क्रिकेट मालिकेतल्या दुसऱ्या सामन्यात आज दुसऱ्या दिवशी भारताचा पहिला डाव १५६ धावांवर आटोपला. काल सामन्याच्या पहिल्या दिवशी न्यूझीलंडने भारतासमोर २५९ धावांचं आव्हान ठेवलं होतं. मात्र, आज न्यूझीलंडच्या गोलंदाजांपुढे भारतीय फलंदाजी ढेपाळली. विराट कोहली, रोहित शर्मा, रिषभ पंत हे खेळाडू फारशी चमक न दाखवताच तंबूत परतले. यशस्वी जयस्वाल आणि शुभमन गिल यांनी प्रत्येकी ३० धावा केल्या. तर रवींद्र जडेजा यानं ३८ धावा केल्या. न्यूझीलंडकडून सतनेर याने सर्वाधिक ७ गडी बाद केले. पहिल्या डावात १०३ धावांची आघाडी मिळाल्यानंतर आज न्यूझीलंडचा संघ फलंदाजीला उतरला आहे.

शेवटचं वृत्त हाती आलं तेव्हा न्यूझीलंडच्या ४ बाद १२४ धावा झाल्या होत्या.

**//<><><><><>//**